Session : 7

Date : 23/09/25

News : lokmat

लोकमत

# चंदननगर लांबोटी शाळेत सायबर सुरक्षेवर कार्यशाळा

**लांबोटी :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चंदननगर (लांबोटी, ता. मोहोळ) येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ व क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सध्या अनेक प्रकारे लोकांची ऑनलाइन फसवणूक होत आहेत. कोणीतरी फोन करतो, मी बँकेतून बोलत आहे म्हणून विश्वासाने आपणास फसवतो. असे होऊ नये म्हणून अशा चर्चासत्राची आवश्यकता असल्याचे मुख्याध्यापक हमीदिखाँ पठाण यांनी या कार्यशाळेत सांगितले. आपण ऑनलाइन फसवणुकीची शिकार होऊ नये यासाठी कोणती काळजी घ्यावी, याविषयी आरती माळी व ऋतुजा गाडे या विद्यार्थिनींनी या विषयावर मार्गदर्शन केले. मोबाइलवर आलेला ओटीपी कोणालाही सांगू नये, अनोळखी मोबाइल नंबरवरून आलेल्या फोन कॉलची पडताळणी करून घ्यावी. सोशल मीडियावर आलेल्या मेसेजेस व लिंकची शहानिशा करूनच पुढील प्रक्रिया करावी, असे सांगितले. या कार्यक्रमास मुख्याध्यापक हमीदिखाँ पठाण, रामचंद्र गोफने, विजया मोरे, निर्मला रोकडे, शगुफ्ता शेख, गणेश गावडे, निलम माळी, उर्मिला साखरे, स्वाती शिंदे व विद्यार्थी उपस्थित होते.

Hello Solapur Gramin
Page No. 4 Sep 23, 2025
Powered by: erelego.com